## तलाठी दप्तर- एक नजर

| अ.क्र. | गा.न.नं. | तपशील |
|---|---|---|
| १ | १ | जमिनीचा आकारबंध, जमिनीचे गट/ सर्व्हे नंबर, आकार याची नोंदवही. |
| २ | १ अ | वन जमिनीची नोंदवही. |
| ३ | १ ब | बिनभोगवट्याच्या सरकारी मालकीच्या जमिनींची नोंदवही. |
| ४ | १ क | भोगवटादार वर्ग २ च्या व ग्रा. पं. कडे निहित जमिनींची नोंदवही. |
| ५ | १ ड | सिलिंग कायद्यान्वये घोषित अतिरिक्त जमिनींची नोंदवही |
| ६ | १ ई | गावातील सरकारी जमिनींवरील अतिक्रमणांची नोंदवही. |
| ७ | २ | गावातील सर्व बिनशेती (अकृषिक) जमिनींची नोंदवही. |
| ८ | ३ | गावातील सर्व (सरंजाम/देवस्थान इनाम) दुमाला जमिनींची नोंदवही. |
| ९ | ४ | गावातील संकीर्ण महसूलाच्या हिशोबाची नोंदवही. |
| १० | ५ | गाव नमुना नं. १ ते ४ चा व क्षेत्र, आकार याचा गोषवारा. गावाचे एकूण क्षेत्रफळ, महसूल, जि. प. कर याबाबतची नोंदवही. |
| ११ | ६ | हक्काचे पत्रक किंवा फेरफार रजिस्टर. (जमिनीच्या सर्व व्यवहारांची नोंदवही) |
| १२ | ६ अ | विवादग्रस्त प्रकरणांची नोंदवही |
| १३ | ६ ब | विलंब शूल्क नोंदवही |
| १४ | ६ क | वारस नोंदवही |
| १५ | ६ ड | जमिनीचे पोटहिस्से, वाटणी, भूमी संपादन नोंदवही. |
| १६ | ७ | ७/१२ मध्ये समाविष्ट नमुना-जमीन मालकाचे नाव, क्षेत्र, सर्व्हे/हिस्सा/गट नंबर, पोट खराबा, आकार, व इतर बाबींची नोंद |
| १७ | ७ अ | ७/१२ मध्ये समाविष्ट असून कुळ हक्काबाबतची नोंद |
| १८ | ७ ब | अधिकार अभिलेखानुसार जमीन कब्ज्यात असल्याचे मानण्यात येणाऱ्या व्यक्ती व्यतिरिक्त जमीन कब्ज्यात असलेल्या व्यक्तीची नोंदवही |
| १९ | ८ अ | गावातील खातेदारांची नोंदवही |
| २० | ८ ब | वार्षिक येणे रक्कम व वसुली  नोंदवही |
| २१ | ८ क | जमीन महसूलाव्यतिरिक्त इतर सरकारी येणेबाबतची नोंदवही |
| २२ | ८ ड | वसूल केलेले सरकारी येणे व इतर रोख रकमांची नोंदवही (कॅश बुक) |
| २३ | ९ | जमीन महसूल दैनिक जमापुस्तक (किर्द) |
| २४ | ९ अ | जमीन महसूलाव्यतिरिक्त इतर सरकारी येणे रकमांच्या वसुलीची नोंदवही |
| २५ | ९ ब | किर्द रजिस्टर. गा.न.नं. ९ ची पावती पुस्तके व इतर पावती पुस्तके यांची नोंदवही |
| २६ | १० | चलन फाईल |
| २७ | १० अ | जमीन महसूलाच्या रकमेखेरीज इतर रक्कम कोषागारात भरणेचे चलन |
| २८ | ११ | गा.न.नं. १२ चा गोषवारा (पिकांच्या आकडेवारीची नोंदवही.) |
| २९ | १२ | ७/१२ मध्ये समाविष्ट असून पिकाखालील/पडीक क्षेत्र, सिंचन व्यवस्थेची नोंदवही |
| ३० | १३ | ग्रामसेवकांकडून गावाची लोकसंख्या, गुरे आणि शेतकी अवजारे याबाबतची माहिती घेऊन ठेवलेला गोषवारा. |
| ३१ | १४ | गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व साधनांची नोंदवही |
| ३२ | १५ | आवक-जावक नोंदवही |
| ३३ | १६ | पुस्तके, नियम पुस्तिका, स्थायी आदेश संचिका |
| ३४ | १७ | संकीर्ण महसूल बसवण्यासंबंधीचे प्रतिवृत्त नोंदवही |
| ३५ | १८ | मंडलअधिकारी यांच्यासाठी आवक-जावक नोंदवही |
| ३६ | १९ | तलाठी यांच्या ताब्यात असलेल्या सरकारी मालमत्तेची नोंदवही |
| ३७ | २० | पोस्टाच्या सरकारी तिकिटांची नोंदवही |
| ३८ | २१ | मंडलअधिकारी यांची मासिक दैनंदिनी |